# ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास

चंद्रकुमार नलगे

रिया पब्लिकेशन्स्

**ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास : चंद्रकुमार नलगे**

**© चंद्रकुमार नलगे**
‘चंद्रबन’, साहित्य निवास कॉलनी,
उजळाईवाडी, कोल्हापूर.
फोन : ०२३१ - २६७७०३४

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
मिरर प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर.

**द्वितीय आवृत्ती**
मार्च, २०१२

**किंमत**
रुपये ३००/-

मित्रवर्य
प्रा. भास्कर चंदनशिव,
प्रा. द. ता. भोसले,
रामदास फुटाणे,
डॉ. सुरेश सावंत यांना
आदरपूर्वक अर्पण

# प्रास्ताविक...

आधुनिक मराठी साहित्यामध्ये विविध प्रवाह निर्माण झाले आहेत. या प्रवाहांनी मराठी साहित्य समृद्ध केले आहे. काही परिवर्तनेही घडविली आहेत. एकूणच मरांठी साहित्य विकसित होण्यास मदत झाली आहे. ग्रामीण वाङ्मयाचा प्रवाह हा तसा प्रमुख प्रवाह आहे. त्याचा प्रवासही दीर्घ स्वरूपाचा आहे. मराठी साहित्याला या प्रवाहाने चैतन्य दिले आहे, गती दिली आहे. अस्पर्शित राहिलेल्या रसरशीत जीवनाचे दर्शन घडविले आहे. मात्र या ग्रामीण साहित्याची व्हावी तशी समीक्षा झालेली नाही. दलित साहित्याला जसे समीक्षक लाभले, तसे ग्रामीण साहित्याच्या संदर्भात गुणात्मकतेने घडले नाही. सर्वंकष आणि एकत्रित स्वरूपाची आलोचनाही झाली नाही. एकूण मराठी साहित्याचा इतिहास लिहिताना समग्र ग्रामीण साहित्याचा व साहित्यिकांच्या साहित्यकृतींचा परिचय व्हायला पाहिजे तेवढा होऊ शकलेला नाही. ग्रामीण साहित्याच्या पूर्वखुणा प्राचीनाच्या मुळापर्यंत जाऊन पोहोचल्या असल्या तरी त्याची सर्वांगीण साक्ष घडलेली नाही असेच जाणवल्याशिवाय राहू शकत नाही.

अलीकडे ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, आदिवासी साहित्य, जनवादी साहित्य इ. स्वरूपाची चर्चा होते. मात्र अभ्यासकांच्या समोर या प्रवाहांचा म्हणून एकत्रित व समग्र असा इतिहास नाही. विविध वाङ्मयप्रकारांनुसार विविध व पूर्णतया नोंदी नाहीत. ही उणीव भरून काढण्यासाठी 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास' वाङ्मयप्रकारानुसार का होईना उपलब्ध व्हावा असा विचार आला आणि हे होणे गरजेचे व निकडीचे

होते, म्हणून ग्रामीण वाङ्मयाच्या अभ्यासकांना तशी विनंती केली. वाङ्मयप्रकारानुसार समालोचन केलेले त्यांचे लेख अगदी वेळेवर मिळाले.

या ग्रंथाने ग्रामीण वाङ्मयाचा प्रवाह किती समृद्ध आहे याचे दर्शन तर घडेलच; पण ग्रामीण वाङ्मयाचा संपूर्ण इतिहास मराठीत प्रथमच उपलब्ध होत आहे हे या ग्रंथाचे ऐतिहासिक महत्त्व आहे. एक सतत जाणविणारी उणीव भरून निघाली याचाच आनंद आहे. शिवाय ग्रामीण साहित्यात कोणते अपुरेपण आहे, कोणते वाङ्मयप्रकार दुर्लक्षित आहेत, ग्रामीण साहित्याने ग्रामीण जीवनातील बदलाची कितपत चित्रणे केली आहेत, खेड्यापाड्यांतील परिवर्तनाची आव्हाने कितपत पेलली आहेत इत्यादी गोष्टींचे अंतर्मुख होऊन चिंतन करायला लावील.

या ग्रंथाच्या संकल्पाची पूर्ती करण्यासाठी मान्यवर अभ्यासकांनी आत्मीयतेने सहकार्य केले आहे. शिवाय या ग्रंथाच्या प्रकाशनाची जोखीम अजब पब्लिकेशन्सचे मा. शीलत मेहता, मा. उल्हासजी मेहतासाहेब यांनी नेहमीच्याच उत्साहाने स्वीकारली म्हणून तर या ग्रंथाची परिपूर्ती सुंदर स्वरूपात झाली आहे. मराठी साहित्याच्या दृष्टीने ही मौलिक अशी कामगिरी आहे. या सर्वांचे ऋण कोणत्या शब्दात व्यक्त करावयाचे ते कळतच नाही. त्यांच्या ऋणात राहणेच मी कर्तव्य समजतो.

**प्रा. चंद्रकुमार नलगे**

## अनुक्रमणिका


१ **ग्रामीण कादंबरी : प्रारंभ ते १९६०** .................... ९
– डॉ. वासुदेव मुलाटे

२ **ग्रामीण कादंबरी : १९६० ते १९८० आणि नंतर**.......... ३९
– डॉ. रत्नाकर बापूराव मंचरकर

३ **मराठी ग्रामीण कादंबरी : १९८० ते १९९१** .............. ९९
**– प्रा. रा. रं. बोराडे**

४ **ग्रामीण कथा : प्रेरणा व विकास** ........................ १०७
– प्रा. चंद्रकुमार नलगे

५ **मराठीतील ग्रामीण ललितलेखन : परंपरा, विकास आणि सद्य:स्थिती** .................... १२९
– प्रा. प्रसन्नकुमार पाटील

६ **मराठी ग्रामीण कविता**................................. १४४
– डॉ. रवींद्र नारायण ठाकूर

७ **नाट्यवाङ्मय**........................................ १७५
– प्रा. दीपक चव्हाण

८ **ग्रामीण आत्मचरित्रांचा उदय**.......................... १९४
– डॉ. आनंद घाटुगडे

९ **ग्रामीण शब्दचित्रात्मक साहित्य**........................ २०५
– प्रा. वसंत केशव पाटील

१० **ग्रामीण साहित्याची समीक्षा**........................... २२५
– डॉ. द. ता. भोसले

११ प्राचीन साहित्यातील ग्रामीणत्व : काही खुणा........... २४८
– डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

१२ आधुनिक ग्रामीण साहित्याने मराठीला काय दिले ?...... २७२
– डॉ. आनंद यादव

१३ शेतकरी साहित्य : एक नोंद............................ २८१
– प्रा. भास्कर चंदनशिव

■ लेखक परिचय...................................... २९९

✦✦

# ग्रामीण कादंबरी : प्रारंभ ते १९६०

**डॉ. वासुदेव मुलाटे**

सर्वसामान्य माणसाप्रमाणेच साहित्याची निर्मिती करणारा, संवेदनशील मनाचा, सर्जनशील साहित्यिक हाही त्या त्या काळाचा, त्या त्या काळात घडणाऱ्या घटनांचा–प्रसंगांचा–साक्षीदार असतो. एवढेच नव्हे तर एकूण समाजाच्याच स्थिती–गतीचा, अधोगतीचा–उत्क्रांतीचा तो साक्षीदार असतो. कधी कधी तर तो स्वत:च काळाच्या लाटेवर हेलकावणाऱ्या जहाजातील एक प्रवासी असतो. अशा वेळी तो प्रत्यक्षानुभव घेणे आणि तो साहित्यातून नोंदवणे अशी दोन्ही कामे करीत असतो. एकूण मराठी कादंबरीचा इतिहास बघितला तरी आपणास उपरोक्त विधानाचाच प्रत्यय येईल.

सामान्यपणे मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी म्हणून ‘यमुनापर्यटन’ या साहित्यकृतीचाच उल्लेख करण्यात येतो. सामान्यपणे यासाठी म्हणावयाचे की वि.का. राजवाडे किंवा श्री. कृ. कोल्हटकरांसारख्या विद्वानांनी ‘यमुनापर्यटन’च्या निर्मितीनंतर अनेक वर्षांनी ती एक कादंबरी म्हणून मानण्यास नकार दिला. खरे तर एकूण कादंबरी ह्या वाङ्मयप्रकाराविषयीच विद्वानांच्यामध्ये मतभेद आहेत. कादंबरी हा वाङ्मयप्रकारच इतका सर्वसमावेशक आहे की, तिची निश्चित व्याख्या करणे कठीण आहे व केली तरी ती परिपूर्ण व कादंबरीचे व्यवच्छेदक लक्षण स्पष्ट करणारी असणार नाही.

‘यमुनापर्यटन’च्या बाबतीत तर आणखी एक बाब अशी सांगता येईल की, ती धर्म-प्रचार व प्रसारासाठी लिहिली गेली. कारण या कादंबरीचे लेखक बाबा पदमनजी यांनी त्यांचा मूळचा वैदिक हिंदू धर्म याचा त्याग करून काही वर्षे आधीच ख्रिस्ती धर्म स्वीकारला होता आणि त्या धर्माच्या प्रसारार्थ त्यांनी विविध वाङ्मयनिर्मिती करण्याचा झपाटा लावलेला होता. ख्रिस्ती धर्माच्या मतप्रसारार्थ उघडलेल्या या लेखनमोहिमेत विशिष्ट वाङ्मय-प्रकाराचे घटक, व्यवच्छेदक लक्षणे पाळणे त्यांना महत्त्वाचे वाटले नसेल. त्यापेक्षाही त्यांना महत्त्वाचे वाटले ते तत्कालीन विधवा स्त्रियांना भोगावे लागणारे आयुष्यभरचे दु:ख. मुळात तो काळच असा होता की, विविध सामाजिक सुधारणा करू इच्छिणाऱ्या अनेक समाजसुधारकांनी आपापल्या दृष्टिकोनातून वाटणाऱ्या सुधारणा करण्याचा आपल्या कृतीतून आणि साहित्यामधूनही सातत्याने प्रयत्न केला.

‘यमुनापर्यटन’च्या निर्मितीपूर्वी एक वर्ष म्हणजे १८५६ मध्ये विधवा विवाहाचा कायदा पास झाला. त्याचे पडसाद समाजमनावर उमटणे अपरिहार्य होते. या पार्श्वभूमीवर बाबा पदमनजी यांनी ‘यमुनापर्यटन’ ही कादंबरी लिहिली.

हे येथे सांगण्याचे प्रयोजन असे की, मराठी ग्रामीण कादंबरीच्या संदर्भातही असेच घडले. ज्या काळात मराठीमध्ये ‘पीयूषभाषिणी व मदनमंजिरी’ (१८८३), ‘क्लेशविमोचन’ (१८८४), ‘मदनमंजिरी’ (१८८५), ‘मंजुळा’ (१८८५), ‘राजपुत्र राजहंस’ (१८८५) या अनुक्रमे वासुदेव रामचंद्र मोहोनी, व्यं. आ. परब, अण्णाजी गोविंद इनामदार, ग. ना. गांगण, अ. के. दप्तरदार यांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. त्याच काळात म्हणजे १८८८ मध्ये ‘बळीबा पाटील’ ही ग्रामीण कादंबरी प्रसिद्ध झाली.

एकोणिसाव्या शतकामध्ये शेतकरी आणि एकूण ग्रामीण कष्टकरी समाजाच्या शोषणाविरुद्ध कार्य करणारे जे थोडेच समाजसुधारक व विचारवंत होऊन गेले, त्यापैकी कै. कृष्णराव भालेकर हे होत. लोक अज्ञानामुळे दिशाहीन झाले आहेत व त्यांच्या अज्ञानाचा फायदा भट-ब्राह्मणांच्या निर्वाहाचे तारू चालले आहे अशी त्यांची खात्री झाली. तत्कालीन समाजात खरे काय, खोटे काय, कोण कोणाला फसवीत आहे व कोण फसला जात आहे, हे भालेकरांनी प्रत्यक्ष पाहिले. जो शेतकरी-कष्टकरी वर्ग फसला जात आहे, ज्याचे शोषण होत आहे त्यासाठी आपण काही करायला पाहिजे अशी समाजसुधारणाविषयक क्रांतिकारी विचारांची बीजे भालेकरांच्या मनात त्या



वेळी अंकुरली. समाजातील अज्ञानी लोकांचे-शेतकऱ्यांचे अज्ञान दूर करणे, दारिद्र्य नष्ट करणे आणि दु:ख नाहीसे करणे यासाठी त्यांनी चालविलेले ‘दीनमित्र’ हे नियतकालिक हा एक महत्त्वाचा उपक्रम होय.

या नियतकालिकाचे संपादन स्वत: कृष्णराव भालेकर करीत असत. याशिवाय समाजसुधारणेस आवश्यक असा मजकूरही लिहीत असत. याच ‘दीनमित्र’मधून त्यांनी एप्रिल १८८८ ते जुलै १८८८ या काळामध्ये ‘बळीबा पाटील आणि १८५७ चा दुष्काळ’ या शीर्षकाखाली लेखन प्रसिद्ध केले. श्री. सीताराम रायकर यांनी संपादित केलेल्या ‘कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मया’त या लेखनाचाच मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी म्हणून समावेश केला आहे.

पंच्याण्णव वर्षाचा वृद्ध बळीबा पाटील हा या कादंबरीचा नायक आहे. निर्व्यसनी व अत्यंत व्यापक विचारांचा हा पाटील आपले गाव, गावातील विविध जाती-जमाती आणि धर्माच्या लोकांवर अत्यंत प्रेम करणारा आहे. तो एकदा अशा विविध जाती-जमाती धर्माच्या मित्रांची आणि त्यांच्या कुटुंबीयांची एक सभा बोलावतो. या सभेत जी चर्चा होते, ती चर्चा म्हणजेच बळीबा पाटील ही कादंबरी होय.

चर्चात्मक स्वरूपाच्या या कादंबरीत ग्रामीण जीवनावर प्रकाश टाकला आहे. शेतकऱ्यांची विविध मोसमांतील ऋतुमानाप्रमाणेची शेतीविषयक कामे, त्यांच्या या कामाचे कष्टमयी स्वरूप, शेतकऱ्यांचा तरीही कसाबसा होणारा उदरनिर्वाह, त्यांचे निकृष्ट राहणीमान यांचे दर्शन या कादंबरीत घडते. तसेच खेड्यातील ही अज्ञानी कष्टकरी जनता आणि त्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन लुटणारे, फसविणारे, प्रसंगी भांडणे लावणारे गावकामगार पाटील व कुलकर्णी यांचेही चित्रण भालेकरांनी केले आहे. त्यामुळे ग्रामीण वातावरण आणि गावगाडा यांचे एक धूसर चित्र डोळ्यांसमोर उभे राहते.

म्हणूनच रायकर यांनी ‘बळीबा पाटील’ ही जरी मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी आहे असे म्हटले तरी ग्रामीण साहित्याचे एक भाष्यकार डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी ‘पाचोळा’ आणि ‘दहा समीक्षक’ या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेत (पृष्ठ १०) संदिग्धता व्यक्त केली आहे. ते म्हणतात, ‘‘एकंदरीत ‘बळीबा पाटील’ या कादंबरीच्या प्रारंभीच्या भागातून ग्रामीण वातावरणाचा आणि गावगाड्याचा काहीसा प्रत्यय येतो. अर्थात कादंबरीसारख्या वाङ्मयप्रकारातून ज्या भरघोसपणे ग्रामीण जीवनाचा प्रत्यय यायला पाहिजे तसा प्रत्यय येथे येत नाही एवढे

मात्र खरे. एवढ्या सगळ्या मर्यादा मान्य करूनही मराठीतला हा पहिलावहिला प्रयत्न आहे असे नोंदवायला हरकत नाही.''

याशिवाय या संदर्भात ग्रामीण साहित्य चळवळीचे एक अध्वर्यू आणि भाष्यकार डॉ. आनंद यादव यांचेही मत विचारात घ्यावे लागते. 'ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव' या त्यांच्या ग्रंथातील पहिली मराठी ग्रामीण कादंबरी – 'पिराजी पाटील' (पृष्ठ ११७) या लेखात स्पष्टच लिहितात, ''पिराजी पाटील ही धनुर्धारी (रामचंद्र विनायक टिकेकर) यांनी १९०३ साली प्रसिद्ध केलेली पहिली मराठी ग्रामीण कादंबरी मानावी लागते.''

या दोन विद्वानांच्या विधानांचा विचार केला आणि तत्कालीन वाङ्मयक्षेत्रातील परिस्थितीचा विचार केला तर असे दिसते की, 'बळीबा पाटील' लिहिली गेली त्या काळात कादंबरी म्हणून काही वेगळेपणाने लिहिले पाहिजे ही जाणीव नव्हती. खरे तर 'बळीबा पाटील'चे लेखन म. फुल्यांच्या आणि सत्यशोधक समाजाच्या दृष्टिकोणातून झालेले आहे. डॉ. कोत्तापल्ले म्हणतात त्याप्रमाणे विशिष्ट तत्त्वे डोळ्यांपुढे ठेवून तोपर्यंत मराठीत कादंबरी लिहिली गेली नव्हती, आणि भालेकरांनी तर मराठीत ज्या काळात अद्‌भुतरम्य कादंबऱ्या लिहिल्या जात होत्या, अशा काळात 'बळीबा पाटील'चे लेखन केले आहे. त्यामुळे त्या काळात कादंबरी ही संकल्पना किती धूसर असेल हे आपणास लक्षात घ्यावे लागते आणि काळाच्या पातळीवर तिचे स्वरूपही ठरवावे लागते. म्हणूनच या ठिकाणी एवढे निश्चित म्हणता येईल की, 'पिराजी पाटील' ही मराठीतील पहिली यशस्वी कादंबरी आहे. मात्र, तिच्याही पूर्वी 'बळीबा पाटील'सारखी ग्रामीण जीवनाचा वेध घेणारी, ग्रामीण वातावरणाचे चित्रण करणारी साहित्यकृती म्हणजे कादंबरीलेखनाचा एक प्रयत्न आहे.

आणि आता याच पार्श्वभूमीवर पहिली यशस्वी ग्रामीण कादंबरी म्हणून धनुर्धारींच्या उपरोल्लेखित 'पिराजी पाटील' या कादंबरीचा विचार करावा लागतो. धनुर्धारीसुद्धा हरिभाऊ आपटे यांचे समकालीनच आहेत. अशा काळात धनुर्धारी यांनी 'बालविवाह', 'बालजरठ विवाह', 'केशवपन', 'विधवाविवाह' यासारख्या पांढरपेशी जीवनातील समस्यांचे चित्रण करणारी एखादी कादंबरी लिहावयाचे सोडून 'पिराजी पाटील'च्या रूपाने एक वेगळी नवी वाट चोखाळली आहे हे विशेष आहे.

लेखक स्वत: प्रवास करीत असताना एका रेल्वे स्टेशनवर त्याला पिराजी पाटील हा या कादंबरीचा नायक भेटतो अशी कल्पना मांडली आहे. पिराजी पाटील



लेखकाला आपली, आपल्या कुटुंबाची, आपल्या वाताहत झालेल्या गावाची कहाणी सांगतो. ही कहाणी म्हणजेच या कादंबरीचे कथानक होय. दुष्काळामध्येही मोठ्या मनाचा, उदार अंत:करणाचा पिराजी पाटील आपल्या गावातील गावकऱ्यांची उपासमार होऊ नये, पोटासाठी त्यांनी गाव सोडू नये यासाठी धडपडतो. आपल्यापरीने त्यांना जपतो. मदत करतो. तरीही दुष्काळ सारखा लांबत जातो, त्यामुळे अस्मानी-सुलतानीच्या भयाण विळख्यात सापडलेली माणसे सैरभैर होतात. मरणाची भीती आणि ख्रिश्चन धर्मीयांच्या प्रचार-प्रसार माध्यमातून निर्माण झालेला मोह यामुळे धर्मांतरासारखा मार्ग अवलंबितात. दुष्काळ, रोगराई, दरवडेखोर, संकटातही उफाळून येणारी स्वार्थलोलुपता, दरवडे, खून, शासकीय अधिकाऱ्यांनी केलेली लुबाडणूक, मोहाला बळी जाणारी माणसे या सर्वांपुढे पिराजी पाटलाला हार पत्करावी लागते. गावाची वाताहत त्याला उघड्या डोळ्यांनी पाहावी लागते. या वाताहतीने अस्वस्थ झालेल्या मनाने पिराजी पाटील ही सर्व हकीकत लेखकाला सांगतो.

ही हकीकत वाचली म्हणजे लक्षात येते की, धनुर्धारी यांनी हे लेखन अत्यंत जिव्हाळ्याने, अंत:प्रेरणेने केले असून ते प्रत्ययकारी असे आहे. त्यांची ही अंत:प्रेरणा मनोरंजनाची नाही तर माणुसकीबद्दलच्या अंत:तळमळीची आहे.

थोडक्यात एखाद्‌दुसऱ्या दोषाचा, अतिरंजिततेचा अपवाद वगळला तर 'पिराजी पाटील'मध्ये तत्कालीन खेड्यांचे, तेथील ग्रामव्यवस्थेचे, दैनंदिन व्यवहारांचे जे वास्तवदर्शी आणि जिवंत वाटावे असे चित्र रेखाटले आहे, ते अत्यंत प्रशंसनीय तर आहेच, त्याचबरोबर या खेड्यात कष्ट उपशीत दारिद्र्यात राहणारा, धर्माचे पालन करणारा श्रद्धाळू, पापभीरू शेतकरी, कुणबी, त्याची कुणबाऊ बोली, त्याचा एकूण स्वभावपिंड यांचेही सूक्ष्मावलोकन, यातून टिपलेले चित्र प्रत्ययकारी असेच आहे. सावकार, गावकामगार यांची दडपशाही, खेडूत माणसाला लुबाडण्याची वृत्ती यांचेही प्रभावशाली दर्शन या कादंबरीत घडते. या कादंबरीमागची लेखनप्रेरणा तत्कालीन ग्रामीण जीवनाचे वास्तवपूर्ण दर्शन घडविणे हीच आहे हेही पटते.

यादृष्टीने विचार केला तर 'पिराजी पाटील' ही मराठीतील पहिली यशस्वी कादंबरी आहे हे मान्य करावे लागते.

१९२० च्या पूर्वीचा कालखंड म्हणजे आधुनिक वाङ्मयाच्या निर्मितीचा प्रारंभाचाच कालखंड होता. शिक्षणाचा प्रसार उच्च किंवा मध्यमवर्गीयांच्या पलीकडे गेलेला नव्हता. त्यातून लेखन करणारी मंडळी ही बहुवंशाने पांढरपेशा वर्गातील व

मोजक्या अशा शहरातून नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने राहणारी होती. आपण राहतो त्या पांढरपेशा नागर जीवनापलीकडेही एक विशाल, विस्तीर्ण असे ग्रामीण जीवन आहे आणि या जीवनातील सुख-दुःख, समस्या हेही लेखनविषय होऊ शकतात याची फारच थोड्यांना जाणीव होती. शिवाय त्यांच्या अनुभवांनाही नागर जीवनाच्या मर्यादा होत्या. म्हणून सत्तर-ऐंशी टक्के खेडी असलेल्या या देशातील आणि महाराष्ट्रातील ग्रामजीवनाचे चित्रण साहित्यात अभावानेच केले जात होते. त्यातूनही हरिभाऊ आपटे, ना.सी. फडके इ. उच्च व मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण करणाऱ्या लेखकांचा तत्कालीन प्रभाव होता. कदाचित या कारणांमुळेही असेल, वास्तवदर्शी ग्रामीण जीवनाचे चित्रण म्हणावे तसे होऊ शकले नाही, ही बाब नाकारून चालणार नाही. कदाचित म्हणूनच 'पिराजी पाटील' च्या नंतर पुढे जवळपास पंचवीस-तीस वर्षे ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारी कादंबरी मराठीमध्ये येऊ शकली नाही हे कटुसत्य स्वीकारण्याशिवाय पर्याय नाही.

१९२० च्या नंतरचा काळ हा अनेकार्थाने महत्त्वाचा आहे. महाराष्ट्रामध्ये राजकीय आणि सामाजिक स्वरूपाची उलथापालथ सुरू झाली होती. परिवर्तनाच्या दिशा उजळू लागल्या होत्या. म. गांधींच्या रूपाने राजकीय क्षेत्रात एका नव्या नेतृत्वाचा उदय झाला होता. हे नेतृत्व एवढे प्रभावी होते की, राजकीय अंगाबरोबरच सामाजिक अंगाचाही विचार मांडणारे ते ठरले. त्याचे दूरगामी परिणाम दिसून येऊ लागले. खरा भारत खेड्यातच आहे म्हणून खेड्यांचा उद्धार झाला पाहिजे, यासाठी 'खेड्याकडे चला' या त्यांच्या घोषणेचा परिणाम तत्कालीन राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांवर तर झालाच; पण एकूणच बुद्धिवाद्यांवर, अनुषंगानेच साहित्याच्या निर्मितिकारांवर झाला असणे असंभवनीय नव्हते. खेड्यातील दीन-दुबळ्यांमध्येच ईश्वर आहे. त्यांची सेवा हीच ईश्वरसेवा. या म. गांधींच्या विचारांचा परिणाम म्हणून तत्कालीन राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांचे लक्ष तर खेड्यांकडे गेलेच; पण लेखकांचेही लक्ष त्यांनी वेधले. पुढे मार्क्सवादी विचारांचीही एक लाट येऊन गेली. त्यामुळेही गरीब, शेतकरी-शेतमजुरांकडे, त्यांच्या प्रश्नांकडे काही मार्क्सवादी विचारांच्या कार्यकर्त्यांचे आणि लेखकांचेही लक्ष वेधले. याशिवाय शाहू महाराज, भाऊराव पाटील यांनी खेड्यापाड्यातील सामान्य, बहुजन समाजातील आणि मर्यादित स्वरूपात तळागाळातील समाजातील मुला-मुलींच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले. त्यातून शिक्षणाचा काही प्रमाणात का होईना खेड्यापाड्यांपर्यंत प्रसार होण्यास



मदत झाली. परिणामतः मराठी साहित्यातून ग्रामीण जीवनदर्शन घडविले पाहिजे या जाणिवेने आणि शहरी वाचकांच्या कुतूहलजागृतीसाठी वेगळ्या वाटा शोधण्याच्या हेतूनेही हे ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविण्यास प्रारंभ झाला होता. ग्रामीण कादंबरीचे लेखन याच जाणिवेतून होत असल्यास नवल नाही.

याच दिशेने होत असलेल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणता येईल अशी प्र. ह. खाडीलकर यांची 'स्वाधीन संसार' (१९२७) या नावाची कादंबरी विचारात घ्यावी लागेल. खेड्यांचा उद्धार कसा होईल हे सांगण्याचा प्रयत्न अत्यंत भावुकपणे या कादंबरीत केला आहे.

भा. वि. वरेरकरांना ग्रामीण जीवन, शेतकरी व खेड्यांमधून शहरात आलेल्या कामगार-वर्गाविषयी विशेष आस्था होती. 'सात लाखांतील एक' (१९३०) ही त्यांची कादंबरी याच आस्थेचा नमुना आहे. गावस्की व देवस्की यांचे खेड्यातून असणारे प्रस्थ आणि त्यामधून निर्माण होणारा संघर्ष यांचे स्थूलमानाने केलेले चित्रण या कादंबरीत आले आहे.

रा. शा. पाटील यांची 'सीता' (१९३१) ही कादंबरी व ग. रा. वाळिंबे तथा रामतनय यांची 'मोहित्यांची मंजुळा' (१९३१) ही कादंबरी या दोन्ही कादंबऱ्या ग्रामीण जीवनाविषयी आस्था व्यक्त करणाऱ्या कादंबऱ्या होत. पैकी. रा.शा. पाटील यांच्या 'सीता'चा लेखनहेतू ग्रामीण जीवनाची तेथील वास्तवाची केवळ तोंडओळख करून देण्याचा आहे.

त्या मानाने 'रामतनय' यांच्या 'मोहित्यांची मंजुळा' चा लेखनहेतू अधिक व्यापक असल्याचे जाणवते. खरे म्हटले तर रामतनय यांची ग्रामीण जीवनाचे चित्रण असणारी ती पहिलीच कादंबरी आहे. ग्रामीण वास्तवाबरोबरच परस्परांतील जातिभेद विसरून समता प्रस्थापित झाली पाहिजे हा विचार मांडणारी ही कादंबरी आहे. गांधीवादी विचार आणि तत्कालीन प्रश्नांचे स्वरूप लक्षात घेऊन या कादंबरीचे लेखन झाले आहे. अर्थात त्या काळात खेड्यापाड्यांतून ज्या ग्रामीण चळवळी कार्यरत होत्या आणि त्या चळवळींमधून ज्या सामाजिक सुधारणा अपेक्षित होत्या. त्या या कादंबरीलेखनामागील प्रेरणा आहेत. रामतनयांना एकूण ग्रामजीवनाचे आकर्षण तर आहेच; पण सहानुभूतीही आहे. खेड्यांतील सामाजिक सुधारणावादी चळवळी काशा वाढतील, आकार घेतील व त्यामधूनच ग्रामीण जीवनाचा कसा विकास होईल याचा जणू त्यांना ही कादंबरी लिहिताना ध्यास लागला होता. म्हणूनच

अनेक नाट्यमय प्रसंगांची रेलचेल, प्रश्नांची गुंतवणूक या कादंबरीत दिसते. मात्र वास्तववादाच्या पातळीवर चित्रण करण्याचे आपले सामर्थ्य प्रकट करण्यासाठी मंजुळा या एका सामान्य शेतकरी कुटुंबातील तरुणीच्या जीवनातील संघर्ष म्हणजे ही कादंबरी असेच म्हणावे लागते.

सामाजिक कार्याची आवड असणाऱ्या मंजुळेचे लग्न एका वैशिष्ट्यपूर्ण परिस्थितीत मानाजीराव पाटलाबरोबर जबरदस्तीने ठरते. ती विहिरीत जीव देण्याच्या उद्देशाने जाते. तेथे तिची अभिलाषा ठेवणारा दुष्ट पुरुष पट्ठेराव तिला आडवा येतो. छळतो. अर्थात पट्ठेराव, त्याची आई, मानाजीराव, विसाजीराव ही सारीच दुष्ट माणसे आहेत. टपालातून आलेली पत्रे फोडून वाचणे, दुसरी बनावट पत्रे तयार करून लखोट्यातून पाठवणे, पठाणांचा धाक दाखविणे, पैशाची लालूच दाखविणे, आगी लावणे, मोटारी पळविणे इ. उद्योग ही मंडळी करते. कुळांना फितवून ब्राह्मणांच्या जमिनी ओस पाडणे, त्यांच्या घरांना आगी लावणे, त्यांनी विहिरीवर पाणी भरू न देणे, अपमान करणे, विवाहप्रसंगी मारहाण करणे इ. घटना येथे आहेत. यावरून ब्राह्मण-ब्राह्मणेतरवादाने खेड्यापाड्यांतून कसे उग्र रूप धारण केले होते हे लक्षात येते. तसेच गावकामगारांच्या लांड्यालबाडीचे आणि लाचलुचपतीचेही चित्रण यात केलेले आहे. तमाशेमंडळी व टारगट वर्तमानपत्रे यांच्यामुळे सामाजिक जीवन बदलले जाणार नाही ही जाणीवही तेथे स्पष्ट झाली आहे. ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीच्या चर्चेची गरज असलेल्या काळात ही कादंबरी लिहिली गेली आहे. ज्या ब्राह्मण समाजाविरूद्ध ब्राह्मणेतरांची चळवळ उभी राहिली, त्या समाजाचे दोष या चळवळीला कारणीभूत ठरले आणि ब्राह्मणांच्या ठिकाणी असलेल्या कोणत्या गुणांकडे त्यांचे दुर्लक्ष झाले याचे समतोल व अत्यंत अलिप्ततेने या कादंबरीत विवेचन केले आहे. त्यांनी रेखाटलेल्या व्यक्तिरेखा असोत, घटना असोत किंवा वसतंऋतूतील निसर्गाचे बहारदार वर्णन असो या सर्वांमधून लेखकाचे सूक्ष्मावलोकन लक्षात येते. चांगल्या गुणांबरोबरच अनेक दोषांनी परिपूर्ण असलेली, हरिभाऊ आपट्यांच्या लेखनाचा प्रभाव असणारी ही कादंबरी त्या काळात बरीच लोकप्रिय ठरली.

'खरा उद्धार' ही रामतनयांची १९३६ मध्ये प्रसिद्ध झालेली कादंबरी आहे. १९३०-३५ च्या दरम्यान खेड्यांतील असलेल्या समाजस्थितीवर या कादंबरीचे



लेखन आधारित आहे. ही जशी ग्रामीण कादंबरी आहे, त्याप्रमाणेच ती ध्येयप्रधान व बोधप्रधानही आहे. शेतकऱ्यांचे अज्ञान व सावकारांची लोभीवृत्ती यावर आधारलेली ही कादंबरी नायकप्रधान आहे. मानवी स्वभावाच्या अनेक सूक्ष्म छटा रेखाटण्याचा प्रयत्न यात दिसतो.

या कादंबरीचा नायक अरविंद याला राष्ट्रोद्धाराची असीम तळमळ आहे. सामान्य लोकांचे अज्ञान घालवणे, त्यांचा विकास घडवून आणून त्यांचे दारिद्र्य आणि दु:ख यांचा नाश करून त्यांना सुखी करण्याचे ध्येय मनात ठेवून खेड्यात आलेल्या अरविंदाची ही कहाणी आहे; परंतु नि:स्पृह, परोपकारी, नीतिमान आणि सौम्य-संयमी स्वभावाच्या अरविंदाला त्याच्या कार्यात अनेक अडथळे व संकटे येतात. खेड्यांतील लोकांना माणूस बनविणे, आरोग्यशास्त्र व नागरिकांची कर्तव्ये यांचे शिक्षण देणे, ग्रामकंटकाच्या छळापासून त्यांना वाचवणे, यासाठी काय करता येईल याचा विचार यात मांडला आहे. अर्थात येथेही लेखकाने एका प्रचारकाचीच भूमिका धारण केली आहे यात संशय नाही.

हे काहीही असले तरी ग्रामजीवनाचे सम्यक ज्ञान आत्मसात करून, खेडुतांच्या सुधारणेसाठी करीत असलेले प्रयत्न आणि वास्तवतेतील परिस्थिती यांचे प्रभावी सामाजिक प्रतिबिंब या कादंबरीत उमटलेले आहे.

रामतनयांच्या ग्रामीण जीवनाचे वास्तव परंतु मर्यादित दर्शन घडवणाऱ्या या दोन्ही कादंबऱ्यांवर गांधीवादाचा प्रभाव जाणवतो.

थोडेसे पुढे म्हणजे १९३७ मध्ये 'अन्नदाता उपाशी' ही वि. वा. हडप यांची कादंबरी प्रसिद्ध झाली. सुरुवातीला नाथ माधवांच्या कादंबरीलेखनाने प्रभावित झालेले हडप नंतरच्या काळात स्वत:चा मार्ग चोखाळीत असलेले दिसतात. वैचारिकदृष्ट्याही त्यांच्यात बराच बदल झालेला दिसतो. कारण या काळात गांधीवादापाठोपाठ आलेल्या मार्क्सवादाच्या वाऱ्याचा त्यांच्यावर परिणाम झालेला दिसतो. कोकणातील खेड्यातील कष्टकरी-खंडकरी वारल्यांच्या जीवनातील दु:खे आणि त्यांचे जमीनदारांकडून होणारे शोषण यावर त्यांनी या कादंबरीत प्रकाश टाकला आहे. एवढेच नव्हे तर कष्टकरी शेतमजुरांना जागृत करणारा 'कसेल त्याची जमीन' हा संदेश यातून देतात. खंडाने जमीन कसणारा रघू इतरांच्या बरोबरीने शेतमालकाविरुद्ध बंड पुकारतो खरा, परंतु जमीनदारांच्या फोडा आणि झोडा या नीतीपुढे तो हतबल होतो. तो परिस्थितीला शरण जातो; परंतु त्याचे

बंडखोर मन त्याला स्वस्थ बसू देत नाही. मनाच्या या अस्वस्थतेतच तो त्याच्या जमिनीचा मालक बाबाजी याचा खून करतो.

त्याने बाबाजीचा खून करण्यामागे एवढेच एक कारण नसते. तर बाबाजीचा उन्मत्तपणा, त्याचा स्त्री-लंपटपणा एवढा वाढलेला असतो की, तो आपल्या पाशवी विचारांना आवरू शकत नाही. तो रघुनाथची बायको जमना हिच्याशीही अतिप्रसंग करू पाहतो; पण ती त्याला दाद देत नाही. त्यामुळे अधिकच बेभान झालेला बाबाजी रघुनाथच्या सर्वच कुटुंबाचा छळ आरंभितो. त्यांना शेतीवरून घालविण्याचा प्रयत्न करतो. या असह्य झालेल्या परिस्थितीची परिणिती बाबाजीच्या खुनात झालेली दिसते.

प्रत्यक्ष राबणारे, घाम गाळणारे शेतकरी बंड करून उठल्याने चिडलेले शेतमालक त्यांना पैशाच्या लोभापायी मदत करणारे सावकार, पोलीस, गावगुंड यांचा संघर्ष अनेक छोट्यामोठ्या घटना-प्रसंगांमधून रेखाटला आहे. काही अद्भुत वाटावे असे प्रसंग या कादंबरीत आहेत. काहीसे भडक आणि नाट्यमय वाटावेत असेही प्रसंग या कादंबरीत आहेत. मार्क्सवादाचा प्रभावही या लेखनावर जाणवतोच; परंतु असे सर्व असूनही वास्तवाचे वस्तुनिष्ठ दर्शन घडविण्याचा त्यांचा प्रयत्न नजरेआड करून चालणार नाही. कारण ती त्यापुढील ग्रामीण वास्तववादी कादंबऱ्यांच्या पाऊलवाटा निर्माण करणारी वाट आहे.

त्यांची 'गोदाराणी' ही कादंबरीही याच वळणाने जाणारी कादंबरी आहे. मार्क्सवादी विचारदृष्टी स्पष्ट करणारी आणि वास्तवाचे भान असणारी ही कादंबरीही दुर्लक्षिता येणार नाही.

याच परंपरेतील आणखी एक कादंबरी म्हणजे वि. ल. बर्वे यांची 'मुचकुंददरी' कादंबरी होय. या कादंबरीमध्ये वि. ल. बर्व्यांनी चित्रित केलेली आणि खेड्यांचा, तेथील जीवनाचा एक अविभाज्य घटक असलेली निसर्गचित्रे अत्यंत विलोभनीय अशीच आहेत. त्याप्रमाणेच खेड्यातील माणसांचे आणि त्यांच्या भाव-भावनांचे त्यांनी घडवलेले दर्शन वाचकांच्या मनाला आकर्षित करील असेच आहे.

१९२०-१९४० या कालखंडातील कादंबऱ्यांचे स्वरूप सारांशरूपाने सांगायचे झाले तर असे सांगता येईल की, खेड्याच्या उद्धारातच एकूण देशाचा उद्धार आहे, या जाणिवेने उपरोल्लिखित लेखक वळले. त्यांनी ग्रामीण जीवनातील सर्व स्तरांवरील विषमता, दैन्य, अज्ञान, अंधश्रद्धा, ग्रामीण माणसांची रूढिप्रियता नाहीशी करून



त्यांच्यात आत्मभान निर्माण करणे हीच या लेखकांची लेखनप्रेरणा होती. यासाठी त्यांनी खेड्यातील माणसांचे काही प्रश्न गृहीत धरून ते सोडविण्यासाठी उपाय सुचविले आहेत. यासाठी विशिष्ट स्वभावधर्माची पात्रे व वैशिष्ट्यपूर्ण अशा घटनांची रचना आपल्या कादंबऱ्यांमधून केली आहे. हे सर्व त्यांच्या नागरमनाला ग्रामीण जीवनाचे झालेले आकलन होते आणि ते फारच वरवरचे असे होते. तेथील जाणवणारा निसर्ग, शेतीतील कामे, तेथील मुक्त जीवन, त्यांच्या भावभावना यांचे दर्शन नागरी मनाच्या चष्म्यातून आणि सहानुभूतीपोटी वाचकांना घडविण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे, असा निष्कर्ष काढल्यास चुकीचे ठरणार नाही.

१९३८ नंतरच्या काळात भारतीय स्वातंत्र्ययुद्ध कमालीचे गतिमान बनले. क्रांतीची बीजे खेड्यापाड्यातील सामान्य माणसांपर्यंत पोहोचली. अनेक लेखक, विचारवंत, राजकीय प्रवक्ते यांनी आपले लक्ष खेड्यांकडे वळविले. याचाच परिपाक म्हणून एकूण मराठी कादंबरीमध्येच परिवर्तन आले. यातूनच प्रादेशिक कादंबरी अवतरली. ही प्रादेशिक कादंबरी एक प्रकारे ग्रामीण कादंबरीच होती. विशिष्ट भौगोलिक रचनेमुळे नागरी जीवनापासून पूर्णतः अलिप्त राहिलेला एखादा अस्पर्श विभाग आपल्या लेखनाचा विषय म्हणून स्वीकारता येईल. तो विभाग किंवा तो प्रदेश, त्या प्रदेशातील निसर्ग, हवामान, वातावरण, पिके, समाजव्यवस्था, सण, उत्सव, सुखदुःखे, नीति-अनीती, जगण्याच्या पद्धती, भाषा, वाक्प्रचार, म्हणी, त्यांच्या विविध रूढ कल्पना, त्यांची दैवते, संघर्ष, समस्या, व्यथा, कथा यांचे खोलवर निरीक्षण करून तिथल्या समाजजीवनाशी एकजीव होऊन तो विशिष्ट भूप्रदेश प्रादेशिक कादंबरीत चित्रित करण्यात येतो.

'पाणकळा' (१९३९) या र. वा. दिघे यांच्या कादंबरीचा विचार या दृष्टीनेच करावा लागतो. दिघे यांची ही कादंबरी त्यांच्या काव्यात्म आणि तेवढ्याच कलात्मक दृष्टीचा प्रत्यय देणारी कादंबरी आहे. 'पाणकळा' हा शब्दच मुळी वैशिष्ट्यपूर्ण आहे. पावसाळा या शब्दापेक्षा तो कितीतरी अर्थवाही आणि आशयघन असा आहे. ग्रामीण जीवन आणि निसर्ग यांचे काही अर्थपूर्ण असे नाते आहे. निसर्गाचा आणि तेथील माणसाचा पदोपदी संबंध येतो. किंबहुना निसर्गाच्या सान्निध्यातच त्याचे आयुष्य जाते. शेती हा ग्रामजीवनाचा केंद्रबिंदू आहे. विज्ञानाने कितीही कृषिव्यवसायात शिरकाव केलेला असला तरी ती आजही बव्हंशाने पावसावर अवलंबून आहे. पाऊस, वारा, ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडाट यांची